॥कर्दळीवन॥ सेवा संघ आयोजित "भारत के कैलास यात्रा"

# मणिमहेश कैलास यात्रा 2022

## भगवान भोलेनाथाची अद्भुत आणि अविस्मरणीय अनुभूती



**वयोमर्यादा: १८ ते ७५ वर्षे**

**दिल्ली ते दिल्ली: ११ दिवस • ५ बॅचेस • जून ते सप्टेंबर**

**सहभागी शुल्क: ₹३६०००/-(+5% GST) • फक्त ₹१०,०००/- भरुन नोंदणी करा.**

सर्व माहिती व ऑनलाईन नोंदणीसाठी **–www.kardaliwan.com/manimahesh**

**मर्यादित जागा ... त्वरीत नोंदणी करा...**

**कर्दळीवन सेवा संघ, पुणे** ६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिज जवळ, डेक्कन जिमखाना, पुणे – ०४
मो: 9657709678 / 9371102439 व्हॉटस्अॅप : 7057617018
फोन: 020-25534601 / 25530371 ईमेल : swami@kardaliwan.com



॥ ॐ नमः शिवाय ॥



# मणि महेश कैलास यात्रा २०२२

## भगवान भोलेनाथाची अद्भुत आणि अविस्मरणीय अनुभूती

**कैलास माहात्म्य : कैलास** हे नाव जरी उच्चारले तर प्रत्येक भारतीयाचा कंठ दाटून येतो. शिव शंकर भोलेनाथ हे प्रत्येकाचे दैवत आहे. कैलासमध्ये प्रत्यक्ष शिवशंकर वास करत असून तीच त्यांची लीला भूमी आहे, अशी प्रगाढ श्रद्धा आहे. शिवशंकराबरोबरच श्रीविष्णु, श्रीब्रह्मा आणि इतर सर्व देव देवता, यक्ष, किन्नर, गंधर्व, अप्सरा इ. सर्व कैलासाच्या परिसरातच रहात आहेत असा विश्वास आहे. त्यामुळे कैलास या नावाभोवतीच एका अद्भुतरम्य अशा गुढतेचे वलय आहे. कैलास यात्रा म्हणजे आत्मोन्नतीची यात्रा होय. कैलासला जाताना आपण मुक्तीच्या मार्गावर वाटचाल करीत असतो. कैलासाबद्दलचे एक विलक्षण आकर्षण जनमानसात हजारो वर्षे घट्ट बसले आहे. यामध्ये काहीतरी विशेष आहे काहीतरी खास बात आहे. ती म्हणजे पावित्र्य, मंगलता आणि अध्यात्मिक उर्जा. कैलास पर्वता सभोवतालची दैवी स्पंदने आणि ईश्वरी कंपने एक अत्यंत उच्च आणि रोमांचकारी अनुभूती देतात.

**भारतातील कैलास -** कैलास म्हटले की पटकन डोळ्यांसमोर चीनने गिळंकृत केलेल्या तिबेटमधील **"कैलास मानसरोवराचे"** नाव येते. मात्र त्याचबरोबर भारतातही तितकेच पुण्यदायी आणि रोमांचकारी अनुभूती देणारे चार कैलास आहेत याची फारशी माहिती नाही. गंमत म्हणजे या चारही कैलासांच्या परिसरात एक सरोवर आहे. भारतातील या चार कैलासांची नावे आहेत - **१) आदि कैलास २) श्रीखंड कैलास ३) मणि महेश कैलास ४) किन्नर कैलास**
खरंतर १९६२ च्या भारत चीन युद्धापूर्वी तिबेटमधील कैलास मानसरोवरला भारतातूनच जाता येत होते. हे पाच कैलास मिळून पंच कैलास यात्रा अशी संकल्पना दृढ होती. पंच कैलासप्रमाणे पंच बदरी, पंच केदार आणि पंच प्रयाग ही हिमालयातील अत्यंत पवित्र क्षेत्रे आहेत.

**मणिमहेश कैलास** यालाच भरमौरी कैलास असेही म्हटले जाते. कारण ते भरमौर या गावाजवळ आहे. मणिमहेश कैलास हे शिव पार्वतीचे क्रिडा स्थान आहे अशी श्रद्धा आहे. आपल्या जीवनातील एकांताचा काळ शिवपार्वती या परिसरामध्ये व्यतीत करतात. मणिमहेश तलाव समुद्रसपाटी पासून सुमारे १३००० फूट उंचीवर असून तेथून समोर दिसणारे भरमौरी कैलास पर्वत शिखर समुद्रसपाटीपासून १९००० फूट उंचीवर आहे. पूर्णपणे बर्फाने आच्छादित अशा या पर्वतावर पहाटे पहाटे एक प्रकाश किरण प्रकट होतो. हा प्रकाश किरण भगवान शंकराच्या गळ्यातील नागाच्या फण्यावर असलेल्या मण्यापासून निघतो आणि या पर्वतावर पसरतो. याचा अर्थ त्या प्रकाशकिरणांबरोबर भगवान शंकरांचे आगमन भरमौरी कैलाशावर झाले आहे. म्हणूनच या तलावाला मणिमहेश तलाव असे म्हटले जाते. मणि महेश कैलास हे ठिकाण हिमाचल प्रदेशामध्ये चम्बा जिल्ह्यामध्ये आहे. दिल्लीपासून ५०० कि.मी. पठाणकोट आणि तेथून १३५ कि.मी. वर चम्बा है ठिकाण आहे. तेथून ६५ कि. मी. भरमौर आणि तेथून १२ किमीवर हडसर या गावापर्यंत रस्त्याने बसने अथवा वाहनाने जाता येते. हडसर वरुन मग पायी परिक्रमा सुरु होते.. हडसर पासून ७ कि. मी. अंतरावर धनछौह हे ठिकाण लागते. त्याच्या पुढे ७ कि. मी. अंतरावर पार्वती कुंड आहे. येथे पार्वती माता स्नान करते अशी श्रद्धा आहे. त्याच्यापुढे १ कि. मी. अंतरावर मणिमहेश कुंड असून त्यासमोर भरमौरी कैलासाचे दर्शन होते. त्यामध्ये अनेकदा गणपती, नंदी, कार्तिकेय इ. देवतांचेही

दर्शन होते अशी श्रद्धा आहे. धनछौह या ठिकाणी भस्मासुराने शिवशंकर प्रसन्न व्हावेत म्हणून उग्र तपश्चर्या केली होती. भगवान शंकर प्रसन्न झाल्यावर ज्याच्या डोक्यावर तू हात ठेवशील तो भस्म होईल असे वरदान त्यांनी भस्मासूराला दिले होते. हे ठिकाण शिवपार्वतीचे क्रिडा ठिकाण असल्याने भस्मासुराला वर देताना शंकराबरोबर पार्वतीही त्यांच्याबरोबर होती. तिला पाहून भस्मासूर पार्वतीच्या मागे लागला. तेव्हा शंकरांनी त्याला अडविले. तर तो शंकराच्या डोक्यावरती हात ठेवण्यासाठी त्यांच्या मागे लागला. नंतर भगवान विष्णू यांनी मोहिनीचे रुप घेऊन नृत्य करता करता भस्मासुराला त्याच्याच डोक्यावर हात ठेवायला लावून त्याचा नाश केला अशी कथा आहे.

**व्यवस्था व कालावधी :** दिल्ली ते दिल्ली - ११ दिवस

**सहभागी शुल्क: ₹३६,०००/- (+ GST - ₹१८००/-)**

**फक्त ₹१०,०००/- भरून नोंदणी करा.** उर्वरीत रक्कम यात्रेच्या ३० दिवस अगोदर जमा करणे.

**बँक खात्याची माहिती :**
**बँकेचे नाव :** बँक ऑफ महाराष्ट्र, डेक्कन जिमखाना शाखा, पुणे ४११००४
**खात्याचे नाव :** कर्दळीवन सेवा संघ एल. एल. पी. (Kardaliwan Seva Sangh LLP)
**खाते क्रमांक: 60351921286** **IFSC Code:** MAHB0000003

**संस्थेचा गुगल पे क्रमांक: 9657709678**

**५ बॅचेस : 1 १५ ते २५ जून २०२२ 2 २६ जून ते ५ जुलै २०२२ 3 १७ ते २७ ऑगस्ट २०२२**
**4 ८ ते १८ सप्टेंबर २०२२ 5 २० ते ३० सप्टेंबर २०२२**

- **वैशिष्ट्ये : -**

१) अनुभवी आयोजक, गाईड आणि सामान उचलण्यासाठी शेर्पा

२) सुसज्ज वैद्यकीय किट, ऑक्सिजन सिलिंडर्स आणि इमर्जन्सी व्यवस्था

- **यात्रा कार्यक्रम**

(वयोमर्यादा १८ ते ७० वर्षे)

1. **पहिला दिवस -** दिल्ली आगमन - मुक्काम
2. **दुसरा दिवस -** दिल्ली ते पठाणकोट (बसने) - मुक्काम
3. **तिसरा दिवस -** पठाणकोट ते भरमौर (वाहनाने) - मुक्काम
4. **चौथा दिवस -** भरमौर - भरमानी - भरमौर मुक्काम (ट्रेक ८ किमी)
5. **पाचवा दिवस -** भरमौर - हडसर (जीप १३ किमी) - ढंचो मुक्काम (ट्रेक ७ किमी)
6. **सहावा दिवस -** ढंचो – मणिमहेश तलाव - मुक्काम (ट्रेक ७ किमी)
7. **सातवा दिवस -** मणि महेश - ढंचो मुक्काम (ट्रेक ७ किमी)
8. **आठवा दिवस -** ढंचो - हडसर - भरमौर मुक्काम (ट्रेक ७ किमी)
9. **नववा दिवस -** भरमौर - डलहौसी मुकाम (वाहनाने)

10. **दहावा दिवस -** डलहौसी - पठाणकोट - रात्रीच्या बसने दिल्लीकडे प्रयाण

11. **अकरावा दिवस -** दिल्लीत आगमन - यात्रा समाप्त (दिल्ली येथे फक्त मुक्काम व्यवस्था आहे) त्या दिवशी परतीचा प्रवास करता येईल किंवा दुसऱ्या दिवशी निघू शकता.

■ **यात्रेत सहभागी कसे व्हायचे?** यात्रेच्या पहिल्या दिवशी दिल्ली येथे दुपारी ४ pm नंतर पोहोचावे. तेथे स्वयंसेवकांची भेट होईल. तेथून यात्रेच्या कार्यक्रमानुसार यात्रा सुरु होईल.

**ट्रेकसाठी पोनी म्हणजे घोडा जाताना उपलब्ध आहे. त्यासाठी अंदाजे सरासरी रु. ३००० ते रु. ४००० एवढा खर्च येऊ शकतो. हा खर्च ज्यांना घोडा हवा आहे त्या यात्रींनी प्रत्यक्ष यात्रेच्या दरम्यान करायचा आहे.**

**विशेष सूचना : -** यात्रा कार्यक्रम नियोजित आहे. काही अपरिहार्य कारणे, नैसर्गिक समस्या, दरडी कोसळणे, गाडी ब्रेक डाऊन होणे, रस्ता बंद होणे, राजकीय समस्या, आंदोलने इ. आयोजकांच्या मर्यादांपलिकडे काही घटना घडल्यास कार्यक्रमपत्रिकेमध्ये बदल घडू शकतो याची कृपया नोंद घ्यावी. त्यावेळी सर्व प्रकारचे सहकार्य करावे लागेल.

- यात्रेदरम्यान कोविड-१९ च्या सर्व नियमावलींचे पालन केले जाईल
- **महत्वाचे:** पूर्ण प्रवासादरम्यान आपले ओरिजिनल आधार कार्ड सोबत ठेवावे. तसेच दोन्ही लस घेतल्याच्या प्रमाणत्राच्या दोन प्रति आणि २ फोटो जवळ ठेवावेत.

■ **नोंदणी कशी करावी?**

१) नोंदणी अर्ज पूर्ण भरून, सही करून सोबत आधारकार्ड किंवा पॅनकार्ड झेरॉक्स आणि २ फोटो द्यावेत.

२) नोंदणीच्या वेळी ₹१०,०००/- एवढी रक्कम भरावी लागेल. यात्रेच्या तारखेआधी ३० दिवस उरलेली रक्कम भरावी लागेल.

■ **कॅन्सलेशन / रिफंड बद्दल :**

१) एकदा केलेली नोंदणी कोणत्याही कारणाने रद्द करता येणार नाही. भरलेली रक्कम परत मिळणार नाही. यात्रे आधी ३० दिवस आपण बदली व्यक्ती देवू शकता.

**२) कोरोना किंवा इतर काही शासकीय किंवा अत्यंत अपरिहार्य कारणांमुळे आमच्याकडून यात्रा रद्द करावी लागली तर ५०००/- प्रक्रिया शुल्क वजा करून बाकी रक्कम परत केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.**

■ **मणि महेश कैलास यात्रेसंबंधी महत्त्वाच्या सूचना**

1. हिमालयातील उंचीवरील पर्वतरांगामधील ही यात्रा आहे. प्रत्येक यात्रेकरूला यासाठी तयार केलेले नियम आणि सूचना यांचे पालन करावे लागेल. हिमालयामध्ये आपल्याबरोबर असणारे शेर्पा आणि गाईड यांच्याबरोबर सौजन्यपूर्ण प्रेमळ संवाद आत्मिय वर्तन असणे गरजेचे आहे. प्रत्येक यात्रेकरूने यात्रेदरम्यान समूहाबरोबरच चालायचे आहे. स्वतंत्रपणे किंवा एकट्याने चालू नये.

2. नोंदणी करताना यात्रेकरूंनी मणि महेश कैलास यात्रा करण्यास शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या तंदुरूस्त आहेत याची खात्री करून घ्यावी, ही विनंती. मणि महेश कैलास यात्रे सारख्या साहसी अध्यात्मिक यात्रांमध्ये काही प्रमाणामध्ये निश्चितच जोखिम असते. प्रत्येक यात्रेकरूने ती नीट समजून घ्यावी आणि आपले जवळचे कुटुंबीय, नातेवाईक यांना त्याची कल्पना द्यावी. नैसर्गिक आपत्ती, बदलते हवामान, अचानक आलेल्या अडचणी आणि अनाकलनीय परिस्थिती यामुळे गंभीर समस्या उद्भवण्याचा संभव असतो. हिमालयातील यात्रांमध्ये जिवित हानी, वित्त हानी अपघात घडण्याचे प्रसंगही येवू शकतात. प्रत्येक यात्रेकरूने पूर्णतः स्वतःच्या जबाबदारीवर ही यात्रा करावी. कोणतीही अनपेक्षित घटना घडल्यास कोणत्याही कारणाने आयोजकांना जबाबदार धरता येणार नाही आणि आयोजकांवर कोणतीही कायदेशीर जबाबदारी असणार नाही याची नोंद प्रत्येक यात्रेकरूंनी घ्यावी, ही विनंती.
3. यात्रेदरम्यान फक्त शाकाहारी भोजनाचीच व्यवस्था केलेली आहे याची नोंद घ्यावी. कोणताही यात्रेकरू त्याच्या वर्तनामुळे, शारीरिक परिस्थितीमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे यात्रा करण्यास अयोग्य ठरला तर त्याला यात्रेमधून वगळण्याचा, परत पाठवण्याचा अधिकार यात्रा प्रमुखाकडे असेल याची कृपया नोंद घ्यावी. अशा वगळलेल्या व्यक्तींना कोणताही आर्थिक परतावा मिळणार नाही. यावेळी यात्रा प्रमुखाचा निर्णय सर्वांना बंधनकारक असेल. कृपया नोंदणी करण्यापूर्वी विनासंकोच यात्रेची सर्व माहिती समजावून घ्यावी. शंका समाधान करून घ्यावे. त्यानंतरच नोंदणी करावी.
4. सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायलायीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र हे राहील.

**मणि महेश कैलास यात्रेची तयारी आणि कपडे व अन्य आवश्यक सामानासंबधी सूचना**

**अ)** मणि महेश कैलास यात्रेदरम्यान आपण हिमालयामध्ये १०,००० ते १५,००० फूट उंचीवर जातो. हिमालयातील लहरी हवामान, थंड वारे, अवकाळी पाऊस, बर्फातून प्रवास या गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत. यात्रेआधीपासून दोन महिने रोज किमान ४ ते ५ किमी चालण्याचा सराव करावा. त्याचबरोबर दीर्घश्वसन आणि प्राणायाम याचा अभ्यास करावा. आपल्याबरोबर कमीत कमी सामान तसेच थंडी वाऱ्यापासून, पाऊसापासून रक्षण करणारे कपडे आपल्या बरोबर असावेत.

**प्रत्येक यात्रेकरूंनी खालील वस्तू आपल्याबरोबर घ्याव्यात अशी सूचना आहे.**

1. कानटोपीसह वाऱ्यापासून संरक्षण करणारे जॅकेट - १
2. पूर्ण बाह्याचे स्वेटर - १
3. लोकरीचे हातमोजे १, लोकरीचे पायमोजे २, सूती पायमोजे ३
4. पँट - टी शर्ट / सलवार कमीज ३ ते ४ सेट
5. मजबूत ट्रेकींगचे शूज –१, त्यासोबत शू लेस - २ (नेहमीचे बूट ट्रेकींग साठी चालणार नाहीत)
6. पाण्याची बाटली.
7. सन ग्लास गॉगल.
8. छोटी LED बॅटरी सोबत ४ सेल एक्स्ट्रा
9. रेन कोट (मोठा आकार) / पोंचो
10. सामानासाठी मध्यम आकाराची सॅक - १
11. छोटी पाठीवरची ट्रेकींगसाठी मजबूत सॅक,
12. सन स्क्रिन लोशन.
13. रबरी स्लीपर्स इ.
14. कैमरेचा पाऊच - ज्यात कॅमेरा, पैसे, औषधे, कागदपत्रे ठेवता येतील.

**ब)** यात्रेची सुरूवात दररोज सकाळी ८ च्या दरम्यान होईल. संध्याकाळी ६ पर्यंत पुढच्या टप्यावरील कॅंप वर पोहोचू, सकाळी लवकरात लवकर चालायला सुरूवात करायची आहे.

**क)** यात्रे दरम्यान सावध आणि आत्मविश्वासपूर्वक चाल आवश्यक आहे. अवघड वाटांवर चालताना सर्वांच्या बरोबरीने शेर्पा आणि गाईड यांचे सहकार्य घ्यायचे आहे. एकट्याने कुठलेही धाडस करु नये. यात्रा समूहाने करायची आहे. आपली आणि आपल्या समूहाची काळजी आपल्यालाच घ्यायची आहे.

**ड)** ट्रेकींग दरम्यान आपले लगेज ७ कि.ग्रॅ. एवढ्या मर्यादेमध्ये असावे.

**इ)** रात्रीचा मुक्काम तंबू / गावांमधील घरांमध्ये (Home Stay) आहे. चपाती / पूरी, डाळ, भाजी, भात, लोणचे, पराठे, सूप, चहा, कॉफी आणि स्थानिक भाज्या यांचा आहारात समावेश असेल.

**पुणे ते दिल्ली किंवा मुंबई ते दिल्ली प्रवास**

पुणे - मुंबई येथून दिल्ली अनेक रेल्वे उपलब्ध आहेत. त्याचे एका बाजूचे थर्ड एसी तिकीट सुमारे २०००/- ते २५००/- च्या दरम्यान उपलब्ध आहे. तसेच विमानसेवाही उपलब्ध आहे. त्याचे एका बाजूचे तिकीट सुमारे ४ ते ५ हजार एवढे आहे. दोन ते तीन महिने आधी बुकिंग केल्यास चार हजारपर्यंत तिकीट मिळू शकते. रेल्वे किंवा विमान तिकिटे काढण्यासाठी सहकार्य केले जाईल.

## *तब्बल दीड लाख कोटी चीन सरकारला भेट दिले*

करोडो भारतीयांचे श्रद्धास्थान असलेला कैलास मानसरोवर हा तिबेटचा प्रांत चीनने १९६२ च्या युद्धा दरम्यान भारतीयांची फसवणूक करून बळकावला साधारण १९९० नंतर ते २०२० पर्यंत सुमारे पाच कोटी भारतीयांनी ट्रेकिंग द्वारे तसेच नेपाळ मार्गे कैलास-मानस सरोवराची यात्रा केली आहे. चीन सरकारने प्रत्येक यात्रेकरूकडून त्यासाठी सुमारे ६०० ते ८०० युएस डॉलर्स एवढी जबर फी वसूल केली आहे. (म्हणजे सुमारे ४२,०००/- ते ५६,०००/- रुपये प्रती व्यक्ती) याचा अर्थ गेल्या तीस वर्षात भारतीयांनी, भाविक भक्तांनी कैलास मान सरोवर या आपल्या श्रद्धास्थळाच्या दर्शनासाठी चीन सरकारला सुमारे दीड ते दोन लाख कोटी रुपये मोजले आहेत. तोच चीन सातत्याने भारतावर कुरघोडी करीत आहे, छुपे हल्ले करीत आहे आणि सातत्याने भारताविरुद्ध कार्य करीत आहे यासारखे दुर्दैव कोणते ? म्हणूनच **प्रा. क्षितीज पाटुकले** यांनी कर्दळीवन सेवा संघाच्या वतीने **"भारत के कैलास यात्रा"** ही मोहीम सुरु केली आहे. भारत के कैलास म्हणजे उत्तराखंड राज्यातील १) **आदि कैलास,** हिमाचल प्रदेश राज्यातील, २) **श्रीखंड कैलास,** ३) **किन्नर कैलास** आणि ४) **मणिमहेश कैलास** असे मिळून चार भारतातील कैलास आहेत. अधिकाधिक भारतीयांनी भारतातील कैलासांचे दर्शन घ्यावे असा या मोहिमेचा उद्देश आहे. त्यातून हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या राज्यातील सीमावर्ती भागाध्ये रोजगार निर्माण होईल आणि त्यांच्या अर्थव्यवस्थेला चांगली उभारी येईल असा विश्वास वाटतो.

## कर्दळीवन सेवा संघाविषयी माहिती

कर्दळीवन सेवा संघ पुणे ही धार्मिक साहसी आणि आध्यात्मिक यात्रा परिक्रमा सहली अयोजित करते. नाविन्यपूर्ण, अपरिचित परंतु जागृत आणि दैवी अनुभूती देणाऱ्या यात्रा परिक्रमांचे आयोजन हे कर्दळीवन सेवा संघाचे वैशिष्ट्य आहे.

**कर्दळीवन सेवा संघ पुढील यात्रा - परिक्रमांचे आयोजन करते.**

१) कर्दळीवन परिक्रमा २) श्रीदत्त परिक्रमा ३) उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा

**हिमालयातील यात्रा –**

१) स्वर्गारोहिणी यात्रा- जेथून पांडव स्वर्गाकडे गेले २) आदि कैलास यात्रा ३) मणिमहेश कैलास यात्रा

४) श्रीखंड कैलास यात्रा ५) किन्नर कैलास परिक्रमा ६) पंचकेदार यात्रा ७) पंच बदरी यात्रा

**विदेशातील सहली** – १) जगातील सर्वात मोठे हिंदू मंदिर - अंगकोरवाट कंबोडिया